# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १३७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## बुधवार, दि. ०३ मार्च, २०२१ दुपारी ०२:३० वा.



व्यवस्थापन परिषदेची १३७ वी बैठक बुधवार, दि.०३ मार्च, २०२१ रोजी दुपारी ०२:३० वा. व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - मा. कुलगुरु | अध्यक्षा |
| २) | डॉ. देबेन्द्रनाथ मिश्रा - प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | प्रा. म. म. माने | सदस्य |
| ४) | डॉ. वि. ल. कदम | सदस्य |
| ५) | प्रा. डॉ. र. भि. भोसले | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. अ. बा. शिंगाडे | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. सं. वि. कोटी | सदस्य |
| ८) | डॉ. ह. कृ. आवताडे | सदस्य |
| ९) | श्री. अ. कि. आवळे | सदस्य |
| १०) | डॉ. ब. पां. रोंगे | सदस्य |
| ११) | ॲड. नी. सु. मंकणी | सदस्या |
| १२) | कु. अ. चं. चव्हाण | सदस्या |
| १३) | डॉ. ता. ना. कोळेकर | सदस्य |
| १४) | डॉ. श्रीमती सु. इ. शेख | सदस्या |
| १५) | डॉ. श्रीमती रा. उ. देशपांडे, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी) | सदस्या |
| १६) | सीए श्रेणीक शहा - प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित |
| १७) | सीए श्रेणीक शहा - वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित |
| १८) | प्रा. डॉ. वि. भा. घुटे - कुलसचिव | सदस्य-सचिव |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा.अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अभिनंदन:**

वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाचा विद्यार्थी कु. आदित्य शिवाजी भोसले याची जागतिक स्पर्धेसाठी निवड झाल्याने त्याचे अभिनंदन करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील, डॉ. एस. सी. मांडे - संचालक, नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्सेस, पुणे विद्यापीठ कॅम्पस, पुणे, डॉ. ध. र. माने, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व डॉ. द. व्यं. जाधव, विभागीय सहसंचालक, (तंत्र शिक्षण), पुणे हे व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.

विषय क्र.०१ दि. १५ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १३६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

कुलसचिव यांनी दि.१५ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविला असता, त्याअनुषंगाने सदस्यांनी केलेल्या सूचनाअंती, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव दि. १५ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १३६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह सर्वानुमते वाचून कायम करण्यात आला.

| |
|---|
| • पान क्र. १७ वर विषय क्र. १६ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. |
| पूर्वीचा ठराव |
| विद्यापीठ कर्मचारी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती योजनेच्या अटी व शर्तीसंदर्भात सर्वानुमते खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.<br>१) “विद्यापीठ कर्मचारी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती" योजनेच्या नावात बदल करुन “विद्यापीठ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वैद्यकीय अर्थसहाय्य योजना” असे नामकरण करण्यात आले.<br>२) ३२ आजार ज्यांना शासनाकडून प्रतिपूर्ती मिळते ते वगळता इतर आजारांसाठी ही योजना लागू राहील.<br>३) ज्या कर्मचाऱ्यांनी या योजनेत सहभाग घेतला आहे, त्या संवैधानिक अधिकारी, शिक्षक व वर्ग १ मधील प्रशासकीय अधिकारी यांच्या वेतनातून दरमहा रु.६००/-, वर्ग २ व ३ मधील अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतनातून दरमहा रु.४००/-, वर्ग ४ मधील प्रशासकीय कर्मचारी यांच्या वेतनातून दरमहा रु.२००/- इतकी रक्कम कपात करण्यात यावी.<br>४) वर्गणीप्रमाणे संवैधानिक अधिकारी, शिक्षक व वर्ग १ मधील प्रशासकीय अधिकारी यांना रु.५०,०००/-, वर्ग २ व ३ मधील अधिकारी / कर्मचारी यांना रु.३०,०००/- व वर्ग ४ मधील प्रशासकीय कर्मचारी यांना रु.२०,०००/- इतके अर्थसहाय्य करण्यात यावे.<br>५) आंतररुग्ण विभागातील रुग्णांच्या बाहेरुन आणलेली औषधे व इतर उपचार यांचा खर्च Prescription व Original Bills असतील तरच मंजूर करण्यात यावा.<br>६) बाह्यरुग्णांच्या बाबतीतील औषधांची बिले, वैद्यकीय सल्ला व इतर उपचारांचा खर्च या योजनेअंतर्गत मिळणार नाही. फक्त रुग्ण रुग्णालयात दाखल झाल्यानंतरचेच खर्च मंजूर करण्यात येतील.<br>७) रुग्णवाहिका भाडे खर्च मिळणार नाही.<br>८) रुग्णालयात दाखल करण्यापूर्वी आवश्यक असलेल्या बाह्य रुग्ण सल्ला फी/आवश्यक त्या तपासण्या उदा: एक्स.रे/सिटी स्कॅन/एमआरआय/ सोनोग्राफी/इसीजी/ ईईजी/नएनसीव्ही/२ डी इको इ. खर्चाची देयके मिळणार नाहीत.<br>९) रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्या नंतर फेरतपासणी वेळी होणारा ओपीडी कन्सल्टंसी फी/तसेच प्रयोगशाळेतील तपासण्या / रेडियोलॉजिकल व तदअनुषंगिक इतर आवश्यक तपासण्यांच्या खर्चाची देयके मिळणार नाहीत.<br>१०) देयके मंजूर करण्याचे अधिकार हे समितीकडे राहतील.<br>११) सदर ठरावाची अंमलबजावणी दि.१ मार्च, २०२१ पासून करण्यात यावी. |
| दुरुस्त केलेला ठराव |
| विद्यापीठ कर्मचारी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती योजनेच्या अटी व शर्तीसंदर्भात सर्वानमुते खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.<br>१) सदर योजनेचे नाव हे पूर्वीप्रमाणेच “विद्यापीठ कर्मचारी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती योजना" असे असेल. |

२) ज्या आजारांवरील खर्चास शासनाकडून प्रतिपूर्ती मिळते ते वगळता इतर आजारांसाठी ही योजना लागू राहील.

३) ज्या कर्मचाऱ्यांनी या योजनेत सहभाग घेतला आहे, त्या संवैधानिक अधिकारी, शिक्षक व वर्ग १ मधील प्रशासकीय अधिकारी यांच्या वेतनातून दरमहा रु.६००/-, वर्ग २ व ३ मधील अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतनातून दरमहा रु.४००/-, वर्ग ४ मधील प्रशासकीय कर्मचारी यांच्या वेतनातून दरमहा रु.२००/- इतकी रक्कम कपात करण्यात यावी.

४) संवैधानिक अधिकारी, शिक्षक, वर्ग १ ते ४ मधील प्रशासकीय अधिकारी / कर्मचारी यांना जास्तीत जास्त रु.२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख फक्त) पर्यंतची प्रतिपूर्ती देण्यात यावी.

५) आंतररुग्ण विभागातील रुग्णांच्या बाहेरुन आणलेली औषधे व इतर उपचार यांचा खर्च Prescription व Original Bills असतील तरच मंजूर करण्यात यावा.

६) बाह्यरुग्णांच्या बाबतीतील औषधांची बिले, वैद्यकीय सल्ला व इतर उपचारांचा खर्च या योजनेअंतर्गत मिळणार नाही. फक्त रुग्ण रुग्णालयात दाखल झाल्यानंतरचेच खर्च मंजूर करण्यात येतील.

७) रुग्णवाहिका भाडे खर्च मिळणार नाही.

८) रुग्णालयात दाखल करण्यापूर्वी आवश्यक असलेल्या बाह्य रुग्ण सल्ला फी/आवश्यक त्या तपासण्या उदा: एक्स.रे/सिटी स्कॅन/एमआरआय/ सोनोग्राफी/इसीजी/ ईईजी/एनसीव्ही/२ डी इको इ. खर्चाची देयके मिळणार नाहीत.

९) रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्या नंतर फेरतपासणी वेळी होणारा ओपीडी कन्सल्टंसी फी/तसेच प्रयोगशाळेतील तपासण्या / रेडियोलॉजिकल व तदअनुषंगिक इतर आवश्यक तपासण्यांच्या खर्चाची देयके मिळणार नाहीत.

१०) देयके मंजूर करण्याचे अधिकार हे वैद्यकिय प्रतिपूर्ती समितीकडे राहतील.

११) सदर ठरावाची अंमलबजावणी ही दि.०३ मार्च, २०२१ पासून नव्याने येणाऱ्या प्रस्तावासाठी लागू राहील. तसेच यापूर्वी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची प्रतिपूर्ती ही जुन्या नियमावलीच्या अधिन राहून करण्यात यावी.

१२) सदर "विद्यापीठ कर्मचारी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती" योजना ही पूर्णपणे ऐच्छिक स्वरुपाची असेल.

- पान क्र. १९ वर विषय क्र. १७(२) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

| पूर्वीचा ठराव | |
|---|---|
| विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्राच्या निमित्ताने विद्यापीठातील इतर केंद्र यांच्या नामाभिधानासंदर्भात नियमावलीस खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| १) | संबंधित व्यक्ती/संस्थावर कसल्याही प्रकारचे न्यायालयीन दावे नसावेत. |
| २) | शैक्षणिक, सामाजिक, व्यवस्थापन, आरोग्य, क्रीडा, सांस्कृतिक, औद्योगिक आणि ग्रामीण भाग इ. क्षेत्रात त्या व्यक्तींने (किमान २५ वर्षे) व संस्थेने (किमान ५० वर्षे) कार्य केलेले असावे. |
| ३) | ती व्यक्ती चारित्र्यसंपन्न व नैतिक अधिष्ठान असलेली असावी. |
| ४) | त्या व्यक्तीला/संस्थेला देश/विदेश पातळीवरील मानपत्र, बक्षिसे, पुरस्कार इ. सन्मान प्राप्त झालेले असावेत. |
| ५) | ती व्यक्ती/संस्था यांनी विद्यापीठात स्वतंत्र इमारत उभा करुन देण्याची हमी द्यावी. |
| ६) | त्या व्यक्तीच्या/संस्थेच्या कार्याची महिमा भविष्यात अनेक वर्ष टिकणारी वा चिरकाल असावी. |
| ७) | त्या व्यक्तींच्या प्रतिष्ठानने किंवा संस्थेने भविष्यात त्यांचे कार्य आणि वास्तू सुस्वरुपात पुढे चालविलेली आहे काय? त्यात नवीन अशी भर घातली आहे काय? हे पाहणेही आवश्यक आहे. |
| ८) | भविष्यात विद्यापीठातील प्रशासकीय विभाग, संकुल अथवा विभाग यांना नामाभिधान करण्याची मागणी करण्यात आल्यास सदरची नियमावली लागू राहील. |

| दुरुस्त केलेला ठराव | |
|---|---|
| विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्र व विद्यापीठातील इतर केंद्र यांच्या नामाभिधानासंदर्भात नियमावलीस खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| १) | संबंधित व्यक्ती/संस्थावर कसल्याही प्रकारचे फौजदारी न्यायालयीन दावे नसावेत. |
| २) | शैक्षणिक, सामाजिक, व्यवस्थापन, आरोग्य, क्रीडा, सांस्कृतिक, औद्योगिक आणि ग्रामीण भाग इ. क्षेत्रात त्या व्यक्तींने (किमान २५ वर्षे) व संस्थेने (किमान ५० वर्षे) कार्य केलेले असावे. |
| ३) | ती व्यक्ती चारित्र्यसंपन्न व नैतिक अधिष्ठान असलेली असावी. |
| ४) | त्या व्यक्तीला/संस्थेला देश/विदेश पातळीवरील मानपत्र, बक्षिसे, पुरस्कार इ. सन्मान प्राप्त झालेले असावेत. |
| ५) | ती व्यक्ती/संस्था यांनी विद्यापीठाच्या आराखड्यानुसार इमारत बांधून द्यावी. |
| ६) | त्या व्यक्तीच्या/संस्थेच्या कार्याची महिमा भविष्यात अनेक वर्ष टिकणारी वा चिरकाल असावी. |
| ७) | त्या व्यक्तींच्या प्रतिष्ठानने किंवा संस्थेने भविष्यात त्यांचे कार्य आणि वास्तू सुस्वरुपात पुढे चालविलेली आहे काय? त्यात नवीन अशी भर घातली आहे काय? हे पाहणेही आवश्यक आहे. |

- पान क्र. २० वर विषय क्र. १७(३) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

| पूर्वीचा ठराव |
|---|
| Examination Reforms in Current Scenario बाबत गठित समितीचा अहवाल स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सदरची परीक्षा प्रणाली विकसीत करण्यासाठी रक्कम रु.४ कोटी (अक्षरी रुपये चार कोटी फक्त) तरतूद करण्यास व परीक्षेसाठी रु.२ कोटी (अक्षरी रुपये दोन कोटी फक्त) खर्चासही मान्यता देण्यात आली.<br>सदर परीक्षा प्रणालीबाबत व्यवस्थापन परिषद सदस्यांकडून काही सूचना असल्यास, व्यवस्थापन परिषद सदस्य १० दिवसांच्या कालावधीत विद्यापीठाकडे पाठवतील व त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| दुरुस्त केलेला ठराव |
| सदरचा विषय परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत ठेऊन, आगामी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करण्यात यावा व तो रु. २ कोटीच्या प्रस्तावाबाबत असावा असे सर्वानुमते ठरले. |

- पान क्र. २२ वर विषय क्र. १७(५) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

| पूर्वीचा ठराव |
|---|
| पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेशित संशोधक विद्यार्थी यांच्याकडून जमा करुन घेतल्या जाणाऱ्या शुल्कामधील प्रवेश शुल्क, नोंदणी शुल्क, प्रयोगशाळा शुल्क व ग्रंथालय ठेव या शुल्काव्यतिरिक्त जमा होणाऱ्या शुल्काच्या ३०% रक्कम विद्यापीठाकडे वर्ग करण्यास सर्वानमुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच यापूर्वी विद्यापीठाकडे जमा होणारे विद्यापीठ हिस्सा शुल्क रु.२५१/- पूर्वीप्रमाणेच विद्यापीठाकडे जमा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| दुरुस्त केलेला ठराव |
| पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेशित संशोधक विद्यार्थी यांच्याकडून जमा करुन घेतल्या जाणाऱ्या शुल्कामधील प्रवेश शुल्क, नोंदणी शुल्क, प्रयोगशाळा शुल्क व ग्रंथालय ठेव या शुल्काव्यतिरिक्त जमा होणाऱ्या शुल्काच्या ३०% रक्कम विद्यापीठाकडे वर्ग करणे अथवा सुधारित नियमावली तयार करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.<br>१) डॉ. वि. ल. कदम - अध्यक्ष<br>२) डॉ. ब. पां. रोंगे - सदस्य<br>३) प्राचार्य डॉ. अ. बा. शिंगाडे - सदस्य<br>सदर समितीचा अहवाल विद्या परिषदेच्या माध्यमातून व्यवस्थापन परिषदेस सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. |

विषय क्र. ०२ शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील / विद्यापीठ संकुलातील प्रवेशित विद्यार्थ्याच्या पात्रता आवेदन पत्रातील त्रुटींची पूर्तता विहीत मुदतीत न केल्यास रु.५००/- दंड Covid -१९ च्या प्रादुर्भावामुळे माफ करण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) नुसार, कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली बाब माहितीस्तव.

सदर विषयासंदर्भात तातडीची बाब लक्षात घेता, मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली असून, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव: शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील / विद्यापीठ संकुलातील प्रवेशित विद्यार्थ्याच्या पात्रता आवेदन पत्रातील त्रुटींची पूर्तता विहीत मुदतीत न केल्यास रु.५००/- दंड Covid -१९ च्या प्रादुर्भावामुळे माफ करण्याबाबत, मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

विषय क्र. ०३ कौशल्य विकास केंद्रामार्फत करण्यात येत असलेल्या MoU (सामंजस्य करार) नियमावलीमध्ये सुधारणा करुन नियमावलीमध्ये सुरक्षित ठेव (Security Deposit) अनामत रक्कम व संलग्निकरण शुल्क घेण्यासंदर्भाची बाब समाविष्ट करुन, सदरच्या नियमावलीतील सुधारीत बदलाची बाब विचारार्थ.

कौशल्य विकास केंद्रामार्फत करण्यात येत असलेल्या MoU (सामंजस्य करार) च्या नियमावलीमध्ये MoU करणाऱ्या संस्थेकडून कोणत्याही प्रकारची सुरक्षित ठेव (Security Deposit) अनामत रक्कम घेतली गेलेली नाही. तसेच त्यांच्याकडून कोणतेही संलग्निकरणाचे शुल्क घेण्यात आलेले नाही. त्यामुळे कौशल्य विकास केंद्राच्या नियमावलीतील सुधारीत बदल करण्यास मा. कुलगुरु महोदया यांनी दि.१८/१२/२०२० रोजीच्या टिपणीन्वये मान्यता दिली आहे. यावर चर्चा होऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव: कौशल्य विकास केंद्रामार्फत करण्यात येत असलेल्या MoU (सामंजस्य करार) नियमावलीमध्ये सुधारणा करुन नियमावलीमध्ये सुरक्षित ठेव (Refundable Security Deposit) अनामत रक्कम व संलग्निकरण शुल्क घेण्यासंदर्भाची बाब समाविष्ट करुन, सदरच्या नियमावलीत खालील सुधारीत बदल करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

११) सुरक्षित ठेव (Refundable Security Deposit) अनामत रक्कम रु.५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) इतकी रक्कम सुरक्षित ठेव (Refundable Security Deposit) म्हणून ठेवणे बंधनकारक आहे.

१२) MoU (सामंजस्य करार) करणा-या संस्थेच्या प्रत्येक कोर्स निहाय, कौशल्य विकास केंद्राच्या नियमानूसार संलग्निकरण शुल्क आकारण्यात येईल.

विषय क्र. ०४ शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासाठी विविध संस्थाकडून प्राप्त पात्र प्रस्ताव महाराष्ट्र शासनास शिफारस करण्याची बाब विचारार्थ.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ (४)(क) अन्वये व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या दि.१३/०९/२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही पूर्ण करून सदरचे पात्र प्रस्ताव दि. ०१ एप्रिल, २०२१ पर्यंत शासनास सादर करावेत असे कळविल्यानुसार, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावावर दि.१३/०९/२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदी नुसार कार्यवाही करून पात्र प्रस्ताव शासनास सादर करण्यासंदर्भात, तसेच "उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ सोलापूर" या उपक्रमाअंतर्गत दि.१२/०२/२०२१ रोजी मा.उदयजी सामंत, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तूत विद्यापीठामध्ये शासनाचे सर्व अधिकारी तसेच विद्यापीठाचे मा.कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव व इतर अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीमध्ये प्राप्त सूचनेनुसार, विद्यापीठ परिसरात नव्याने सुरु करण्यात आलेली शैक्षणिक संकुले व अभ्यासक्रमाबाबत स्वतंत्र सहपत्रांसह शासनाकडे शिफारस करण्यासंदर्भात चर्चा होऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव:

१) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासाठी विविध संस्थाकडून प्राप्त पात्र प्रस्ताव, महाराष्ट्र शासनास शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

२) विद्यापीठ परिसरात नव्याने सुरू करण्यात आलेली शैक्षणिक संकुले व अभ्यासक्रमांबाबत स्वतंत्र सहपत्रांसह महाराष्ट्र शासनास शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय क्र. ०५ — सन २०२०-२१ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२१-२२ चा मूळ अर्थसंकल्प अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

सन २०२०-२१ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२१-२२ चा मूळ अर्थसंकल्प अधिसभेच्या बैठकीत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशन करण्यासाठी, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव: सन २०२०-२१ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२१-२२ चा मूळ अर्थसंकल्प अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील यांचे नामनिर्देशन करण्यात आले.

विषय क्र. ०६ **अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर कार्यालयाने तयार केलेली उत्तरे व सदरची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

अधिसभा सदस्यांनी दि.१५ मार्च, २०२१ रोजी होणाऱ्या अधिसभेच्या बैठकीकरिता विचारलेले प्रश्न व सदर प्रश्नांची कार्यालयाने तयार केलेली उत्तरे विचारार्थ घेऊन, २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र. ६ (१३) नुसार, बैठकीत सविस्तर चर्चा करुन सदर प्रश्नांना द्यावयाची उत्तरे सर्वानुमते अंतिम करण्यात आली व अधिसभेच्या बैठकीत उत्तरे देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.

ठराव: **सोबत जोडल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे निश्चित करण्यात आली व अधिसभेमध्ये या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.**



### अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर विद्यापीठ प्रशासनाने तयार केलेली उत्तरे

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| **श्री. ग. रे. धरणे** | | **कु. अ. चं. चव्हाण** |
| १ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर मध्ये शिक्षकेत्तर कर्मचारीचे रोस्टर शासनाकडून तपासून कोणत्या वर्षी घेतले आहे? | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील वर्ग ३ ते ४ संवर्गातील कर्मचाऱ्यांची सन २०१५ मध्ये तर वर्ग १ व २ कर्मचाऱ्यांचे सन २०२० मध्ये बिंदू नामावलीची शेवटची अंतिम तपासणी झालेली आहे. |
| २ | विद्यापीठात बस, लॉन्ड्री, झेरॉक्स याची सुविधा विद्यार्थ्यांना मिळते का? | प्रस्तुत विद्यापीठ परिसरात बस थांबविण्यास परवानगी देण्यात येत असल्याचे मा. परिवहन व्यवस्थापन, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांना विद्यापीठ कार्यालयीन पत्र क्र. पुअहोसोविसो / अभि.विभाग / २०१९ / ७३९७, दि.२५/०९/२०१९ रोजी अन्वये कळविण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्यांना झेरॉक्सची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तथापि, लॉन्ड्रीची सुविधा नाही. |
| **श्रीमती अ. अ. तडवळकर** | | **कु. अ. चं. चव्हाण** |
| १ | पेट परीक्षा जाहिरात दिली का? | पेट ७ ची जाहिरात दिली होती. |
| २ | D.R.C. मुळे विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर परिणाम झाला आहे का? | नाही. |
| ३ | विद्यार्थ्यांना परिक्षेच्या (पेपरच्या) फोटोकॉपी का मिळत किंवा दिल्या जात नाहीत? | मागणीनुसार दिल्या जातात. |
| **श्री. शि. ब. हिरेमठ** | | **ॲड श्रीमती नी. सु. मंकणी** |
| १ | कोरोना महामारीच्या काळात प्राध्यापकांची महाविद्यालयात नियुक्ती झालेली नाही. त्यामुळे त्यांच्या आर्थिक विवंचनेच्या सोडवणुकीसाठी आपण विद्यापीठ म्हणून काय तरतूद केली आहे? | सदरची बाब ही महाविद्यालयाशी निगडीत असून याबाबत विद्यापीठाने कोणतीही तरतूद केलेली नाही. |
| २ | शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग अद्याप लागू केलेला नाही. तर त्यासाठीची तरतूद काय आणि केव्हा लागू करणार? | महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने वेतन-२०१९/प्र.क्र.२७८/१९/विशि-१, दि.०८/१२/२०२०१ अन्वये अधिसूचना व वेतन-२०१९/प्र.क्र.२७८/१९/ विशि-१, दि.१०/१२/२०२० अन्वये शासन निर्णय निर्गमित करुन महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दि.०१/०१/२०१६ पासून काल्पनिकरित्या सातवा वेतन आयोग मंजूर करुन, प्रत्यक्ष लाभ दि.०१/११/२०२० पासून देण्यात आल्याचे आदेश निर्गमित केले आहेत. |
| ३ | सर्व शासकीय आणि जिल्हाधिकारी यांच्याकडून देण्यात येणाऱ्या सुट्ट्या ह्या सर्व महाविद्यालये, सर्व कर्मचाऱ्यांना देतात का? | हा संबंधित महाविद्यालयाने घ्यावयाचा निर्णय आहे. |

<table>
<tr><td colspan="2">श्रीमती रे. अ. महागांवकर</td><td>श्री. अ. कि. आवळे</td></tr>
<tr><td>१</td><td>परीक्षा व मुल्यमापन मंडळ संचालक पद कधी पासून रिक्त आहे?</td><td>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ हे पद दि.१०/१२/२०१९ पासून रिक्त आहे.</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रशासकीय इमारती करिता किती बजेट आहे?</td><td>प्रशासकीय इमारती व परीक्षा भवन करिता सन २०२०-२१ या वर्षाच्या अंदाजपत्रकात रु.३४ कोटी (अक्षरी रुपये चौतीस कोटी फक्त) इतकी तरतूद करण्यात आली आहे.</td></tr>
<tr><td>३</td><td>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठात एकूण सिनेट सदस्यपदे किती आहेत?</td><td>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठात एकूण ७६ सिनेट सदस्य पदे आहेत.</td></tr>
<tr><td colspan="2">श्रीमती प. र. नागणसुरे</td><td>डॉ. ह. कृ. आवताडे</td></tr>
<tr><td>१</td><td>महाविद्यालयातील प्राध्यापकांचे कॅसच्या संदर्भातील कॅम्प किती महिन्यांनी आयोजित केले जातात?</td><td>महाविद्यालयातील प्राध्यापकांचे कॅस आयोजन महाविद्यालय स्तरावर करणे अपेक्षित आहे. तथापि विद्यापीठाद्वारे आवश्यकतेप्रमाणे केंद्रिय पध्दतीने कॅस आयोजन करण्यात येत आल्यामुळे त्यासाठी समय सीमा निर्धारित करता येत नाही.</td></tr>
<tr><td>२</td><td>मा.कुलसचिव डॉ. विकास घुटे यांनी केव्हा राजीनामा दिला?</td><td>प्रा. डॉ. विकास भाऊराव घुटे यांनी कुलसचिव या पदाचा दि.०२/११/२०२० रोजी राजीनामा दिलेला आहे.</td></tr>
<tr><td>३</td><td>नवीन कुलसचिवांची पद भरण्याची मान्यता मिळाली का?</td><td>रिक्त असलेले कुलसचिव हे पद भरण्यास शासनाकडून अद्याप मान्यता प्राप्त झालेली नाही.</td></tr>
<tr><td colspan="2">श्री. रा. शि. गायकवाड</td><td>ॲड श्रीमती नी. सु. मंकणी</td></tr>
<tr><td>१</td><td>ऑक्टोंबर, २०१९ पासून झालेल्या विद्यापीठातील सर्व परीक्षांचे गुणपत्रके महाविद्यालयांकडे वितरीत केली आहेत काय?</td><td>ऑक्टोंबर, २०१९ पासून झालेल्या परीक्षांचे गुणपत्रिका खालील तपशीलाप्रमाणे महाविद्यालयांना वितरित करण्यात आल्या आहेत.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सन</th><th>तपशील</th></tr>
<tr><td>१.</td><td>ऑक्टोंबर, २०१९</td><td>सर्व अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिका वितरीत करण्यात आलेल्या आहेत.</td></tr>
<tr><td>२.</td><td>मार्च, २०२०</td><td>या परीक्षेतील बीसीए अभ्यासक्रमाच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या गुणपत्रिकेच्या छपाईची प्रक्रिया सुरू आहे. All B.Tech., T.E.II व B.A. Hon. Sem.II इ. अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकेची छपाई प्रलंबित आहे. इतर अभ्यासक्रमांच्या गुणपत्रीका वितरीत करण्यात आलेल्या आहेत.</td></tr>
<tr><td>३.</td><td>ऑक्टोंबर, २०२०</td><td>ऑक्टोंबर, २०२० च्या परीक्षा घेण्यात आल्या असून आजमितीस ७०% अभ्यासक्रमाचे निकाल प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदरील अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकांचे छपाई काम प्रगतीपथावर आहे.</td></tr>
</table></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| २ | विद्यापीठ कार्यालयात एकत्रित वेतनावर नेमलेल्या सेवकांची नियुक्ती कोणत्या कलमान्वये करण्यात आली आहे? | एकत्रित वेतनावर नेमलेल्या सेवकांची नियुक्तीची कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या दि.१४ जून, २०१८ रोजीच्या निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेली आहे. |
| ३ | विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचे परिनियम तयार आहेत काय? | नाही. |
| **डॉ. गं. धु. बिराजदार** | | **श्री. अ. कि. आवळे** |
| १ | विद्यापीठ अधिविभागांमध्ये / संकुलांमध्ये करार पध्दतीने नेमलेल्या शिक्षकांचे नावासह दरमहा वेतन किती आहे? | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी करार पध्दतीने नेमलेल्या शिक्षकांची नावे व दरमहा वेतन दर्शविणारी यादी सोबत जोडली आहे. **(सहपत्र ५४ ते ५६)** |
| २ | विद्यापीठातील यंत्रणा विश्लेषक यांचे वेतन कोणत्या विभागामार्फत केले जाते? | विद्यापीठातील यंत्रणा विश्लेषक यांचे वेतन वित्त व लेखा विभागामार्फत केले जाते. |
| ३ | ऑक्टोंबर, २०१९ मध्ये ऑनस्क्रीन उत्तरपत्रिका तपासलेल्या शिक्षकांची बिले दिली आहेत काय? | परीक्षा विभागाकडे प्राप्त झालेले ऑक्टोंबर, २०१९ मध्ये ऑनस्क्रीन उत्तरपत्रिका तपासलेल्या सर्व शिक्षकांची बिले अदा करण्यात आली आहेत. |
| **डॉ. सु. कु. शिंदे** | | **कु. अ. चं. चव्हाण** |
| १ | दिनांक ८ जुलै, २०१९ च्या शासकीय परिपत्रकानुसार CAS ची बैठक प्रत्येक महिन्यात आयोजित केली जाते काय? | नाही. |
| २ | २०१६ च्या पीएच.डी. नियमावलीनुसार (Regulation) संशोधक मार्गदर्शकाची नियमावली तयार केली आहे काय? | नाही, नियमावली तयार करण्याचे काम सुरु आहे. |
| ३ | PET-७ नुसार पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रोव्हिजनल ॲडमिशन दिलेल्या दिनांकापासून निश्चित न करता दि.१ जानेवारी, २०२१ पासून निश्चित करण्याची कारणे काय आहेत? | संशोधन विद्यार्थ्यांनी त्यांचे संशोधन आराखडे जमा केल्यानंतर सदर आराखड्याच्या शिर्षकास अंतिम मंजूरी संशोधन व मान्यता समिती देते. सदर समितीच्या बैठका दि.२४/०८/२०२० ते १४/०९/२०२० या दरम्यान संपन्न झाल्या आहेत. तदनंतर सर्व समिती सदस्यांच्या स्वाक्षरी होऊन संशोधन व मान्यता समितीचे इतिवृत्त संशोधन विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर सदरचे इतिवृत्त मा. कुलगुरु महोदयांची मान्यता झाल्यानंतर पेट-७ मधील पीएच.डी. विद्यार्थ्यांना दि.०१ जानेवारी, २०२१ ही दिनांक निश्चित करण्यात आली आहे. |
| **श्री. सु. तु. सरवदे** | | **ॲड श्रीमती नी. सु. मंकणी** |
| १ | फेब्रुवारी, २०२१ या महिन्यात विद्यापीठाच्या प्राधिकरण व मंडळावरील कोणकोणत्या सदस्यांचे सदस्यत्व संपुष्टात आणले आहे. | डॉ. तु. वि. शिंदे, डॉ. ता. ना. कोळेकर, डॉ. ह. कृ. अवताडे, प्राचार्य डॉ. अ. ना. बारबोले व डॉ.राणू डी. कदम यांचे विद्यापीठाच्या प्राधिकरण व मंडळावरील सदस्यत्व संपुष्टात आणले होते; परंतू मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी पारित केलेल्या आदेशान्वये उक्त सदस्यांचे सदस्यत्व पुर्नस्थापित करण्यात आले आहे. |
| **श्री. स. मा. गायकवाड** | | **श्री. अ. कि. आवळे** |
| १ | PET-७ च्या जाहिरातीमध्ये संशोधक विद्यार्थ्यांच्या विषय व संवर्गनिहाय किती जागा (Seats) दर्शविल्या होत्या? | सोबतच्या तक्त्याप्रमाणे जागा दर्शविल्या होत्या. **(सहपत्र ५७ ते ५९)** |

<table>
<tr><td>२</td><td>विद्यापीठात किती शिक्षण संकूले आहेत. त्यांची स्थापना कोणकोणत्या वर्षात झाली आहे.</td><td>विद्यापीठात एकूण खालील नमूद केल्यानुसार ११ संकुले असून, त्यांच्या स्थापनेचे वर्ष संकुलासमोर दर्शविले आहे.
<table>
<tr><th>अ.क्र</th><th>संकुलाचे नांव</th><th>स्थापना वर्ष</th></tr>
<tr><td>१.</td><td>रसायनशास्त्र संकुल</td><td rowspan="5">दि. २७ मार्च २००८</td></tr>
<tr><td>२.</td><td>पदार्थविज्ञान संकुल</td></tr>
<tr><td>३.</td><td>भूशास्त्र संकुल</td></tr>
<tr><td>४.</td><td>संगणकशास्त्र संकुल</td></tr>
<tr><td>५.</td><td>सामाजिकशास्त्रे संकुल</td></tr>
<tr><td>६.</td><td>वाणिज्य व व्यवस्थापन संकुल</td><td>२०११-१२</td></tr>
<tr><td>७.</td><td>भाषा व वाङ्:मय संकुल</td><td>२०१८-१९</td></tr>
<tr><td>८.</td><td>तंत्रज्ञान संकुल</td><td>२०१८-१९</td></tr>
<tr><td>९.</td><td>आरोग्य विज्ञान संकुल</td><td>२०१९-२०</td></tr>
<tr><td>१०.</td><td>ललितकला व कला संकुल</td><td>२०१९-२०</td></tr>
<tr><td>११.</td><td>जैवविज्ञान संकुल</td><td>२०२०-२१</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>३</td><td>विद्यापीठात सुरु केलेल्या कोणकोणत्या संकूलांना शासन मान्यता घेण्याबाबतचे प्रस्ताव प्रलंबित आहेत?</td><td>विद्यापीठात सुरु केलेल्या संकुलांना शासन मान्यता घेण्यात येत नाही. तर संकुलांतर्गत सुरु केलेल्या अभ्यासक्रमांना शासन मान्यता घेण्यात येते.</td></tr>
<tr><td colspan="2">श्री. दि. अ. चव्हाण</td><td>श्री. अ. कि. आवळे</td></tr>
<tr><td>१</td><td>घड्याळी तासिकेवर किंवा करार पध्दतीने या वर्षी विद्यापीठ परिसंस्थेत किती प्राध्यापकांच्या नेमणूका केल्या आहेत?</td><td>विद्यापीठात घड्याळी तासिकेवर किंवा करार पध्दतीने प्राध्यापकांच्या नेमणूका केल्या जात नाहीत.</td></tr>
<tr><td>२</td><td>त्यांची भरती करण्यासाठी जाहिरात दिली होती का?</td><td>लागू नाही.</td></tr>
<tr><td>३</td><td>मुलाखती घेण्यात आल्या का?</td><td>लागू नाही.</td></tr>
</table>

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

विषय क्र. ७(१) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या याचिका क्र.२७९७/२०१५ वरील दि.०४/०८/२०१७ निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन यापुढे पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त असलेली सर्व १०० टक्के पदे कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा विचार न करता दि.२५/०५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेच्या स्थितीनुसार पदोन्नती आरक्षण विषयी करावयाची कार्यवाही बाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब,दि.१८/०२/२०२१ माहितीस्तव.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या याचिका क्र. २७९७/२०१५ वरील दि.०४/०८/२०१७ निर्णया विरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन यापुढे पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त असलेली सर्व १०० टक्के पदे कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा विचार न करता दि.२५/०५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेच्या स्थितीनुसार पदोन्नती आरक्षण विषयी करावयाची कार्यवाही बाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक: बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.१८/०२/२०२१ ची नोंद घेऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव: मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या याचिका क्र.२७९७/२०१५ वरील दि.०४/०८/२०१७ निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन यापुढे पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त असलेली सर्व १०० टक्के पदे कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा विचार न करता दि.२५/०५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेच्या स्थितीनुसार पदोन्नती आरक्षण विषयी करावयाची कार्यवाही बाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब,दि.१८/०२/२०२१ ची नोंद घेण्यात आली.

**विषय क्र. ७(२)** **दि. १३ डिसेंबर, २०१९ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील विषय क्र. ३६ वर पारित झालेल्या ठरावात कुलसचिव कार्यालयातील कर्मचारी - ५% ऐवजी आस्थापना शिक्षक विभागातील कर्मचारी - ५% अशी अंशत: दुरुस्ती होण्याची बाब विचारार्थ.**

व्यवस्थापन परिषदेच्या दि.१३ डिसेंबर, २०१९ रोजीच्या विषय क्र. ३६ मध्ये विद्यापीठातील शिक्षकांना विविध संस्थांकडून प्राप्त होणाऱ्या प्रकल्पाच्या "अधिव्यय" (Overhead Charges) च्या वाटपात दुरुस्ती करण्याची बाब विचारार्थ ठेवले असता, सदर विषयावर खालीलप्रमाणे ठराव पारित झाला होता.

ठराव: विद्यापीठातील शिक्षकांना विविध संस्थाकडून प्राप्त होणाऱ्या प्रकल्पाच्या "अधिव्यय" (Overhead Charges) च्या वाटपात खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | पाणी व वीज खर्चासाठी | - | १०% |
| २) | कुलसचिव कार्यालयातील कर्मचारी | - | ५% |
| ३) | वित्त व लेखा विभागातील कर्मचारी | - | ५% |
| ४) | संबंधित अधिविभागातील कर्मचारी | - | २०% |
| ५) | संबंधित विभागास आवश्यक असणारी पुरक साहित्य खरेदीसाठी | - | ५८% |
| ६) | ऑडीट फी | - | २% |

दि. १३ डिसेंबर, २०१९ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील विषय क्र. ३६ वर पारित झालेल्या ठरावात अंशत: दुरुस्ती करण्यासंदर्भात, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव:** **दि. १३ डिसेंबर, २०१९ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील विषय क्र. ३६ वर पारित झालेल्या ठरावात कुलसचिव कार्यालयातील कर्मचारी - ५% ऐवजी आस्थापना शिक्षक विभागातील कर्मचारी - ५% अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

विषय क्र. ७(३) Quick Heal Foundation, Pune (QHF) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्याची बाब व सामंजस्य कराराचा मसुदा विचारार्थ.

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ साठी Quick Heal Foundation, Pune (QHF) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये करावयाच्या सामंजस्य करारास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१ (झ) नुसार खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.

ठराव: Quick Heal Foundation, Pune (QHF) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यास व सामंजस्य कराराच्या मसुद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| | |
|---|---|
| विषय क्र. ७(४) | महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या दि. ०१/०२/२०२० रोजीच्या आदेशानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सेवेत शिपाई पदावर सामावून घेणेबाबत श्री. भिकाजी बाळू माने यांचे दि. २४/०२/२०२० रोजीचा विनंती अर्ज विचारार्थ. |

महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि.०१/०२/२०२० रोजीच्या आदेशानुसार, श्री. भिकाजी बाळू माने यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सेवेत शिपाई या पदावर सामावून घेणेबाबत सविस्तर चर्चा करुन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव: महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या दि.०१/०२/२०२० रोजीच्या आदेशानुसार, मा.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग यांच्या मान्यतेच्या अधिन राहून, श्री. भिकाजी बाळू माने यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सेवेत शिपाई या पदावर सामावून घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय क्र. ७(५) ITI Limited (A Government of India Undertaking), Mumbai यांचा Proposal for establishing Cyber Lab to create an upsurge in skill building and quick job absorption संदर्भातील प्रस्ताव विचारार्थ.

ITI Limited (A Government of India Undertaking), Mumbai यांनी Proposal for establishing Cyber Lab to create an upsurge in skill building and quick job absorption या संदर्भात विद्यापीठाकडे सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात चर्चा होऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव: ITI Limited (A Government of India Undertaking), Mumbai यांचा Proposal for establishing Cyber Lab to create an upsurge in skill building and quick job absorption या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| | |
|---|---|
| **विषय क्र. ७(६)** | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे अश्वारुढ शिल्प तयार करण्यासाठी शिल्पकार नेमणूक करण्याची बाब विचारार्थ.** |

मा. उदयजी सामंत, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारणीसाठी शासन स्तरावरुन समिती गठित करणार असल्याचे निर्देश दिले आहेत. तसेच सदर बैठकीत स्मारकासाठी रु.३.०० कोटी (अक्षरी रुपये तीन कोटी फक्त) इतका खर्च अपेक्षित असून राज्य शासनाकडून रु.१.५० (अक्षरी रुपये एक कोटी पन्नास लाख फक्त) इतका निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे मा.मंत्री महोदयांनी आश्वासन दिले आहे व उर्वरित रु.१.५० (अक्षरी रुपये एक कोटी पन्नास लाख फक्त) इतका निधी विद्यापीठ फंडातून उभा करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारणी करण्याच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून चबूतऱ्याचे बांधकाम करण्याची बाब प्रस्तावित असून अश्वारुढ शिल्पाचे काम नामांकित व अनुभवी शिल्पकार यांच्याकडून करून घ्यावे लागणार आहे. त्यांच्याकडून प्राप्त होणारे क्ले मॉडेल कला संचालनालय, मुंबई यांच्याकडून तपासून, प्रमाणित करुन, त्यापुढील कार्यवाही करावी लागणार आहे. त्यानुसार अश्वारुढ शिल्प कामाचा अनुभव असलेले नामांकित व अनुभवी शिल्पकार यांच्याकडून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारणीचे काम करुन घ्यावे लागणार यासंदर्भात सविस्तर चर्चा होऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| **ठराव:** | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे अश्वारुढ शिल्प तयार करण्यासाठी मा. कुलपती तथा राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेच्या अधिन राहून, पद्मश्री पुरस्कार प्राप्त श्री. राम सुतार यांची शिल्पकार म्हणून नेमणूक करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून राष्ट्रगीतानंतर अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| सदस्य सचिव | अध्यक्ष |
| व्यवस्थापन परिषद | व्यवस्थापन परिषद |